# हितगुज लेकीशी

## वयात येताना




| | |
|---|---|
| लेखक - | डॉ. अरुण गद्रे, स्टेशन रोड, लासलगाव.<br>ता. निफाड जि. नाशिक |
| ई - प्रकाशक - | सौ. भाग्यश्री केंगे, मराठीवर्ल्ड.कॉम,<br>२०५, अमर आर्केड, कुलकर्णी कॉलनी, नाशिक - २ |
| दूरध्वनी - | ०२५३- २५७३१९७, २३१९५५०. |
| ई - मेल - | info@marathiworld.com , bak@cnpl.co.in |
| मुद्रीत पुस्तक प्रकाशन - | देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.<br>४७३, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० |
| प्रथम आवृती - | १९९३ |
| दुसरी आवृती - | १९९८ |
| मुखपृष्ठ - | कांचन मित्तल |
| ई - सजावट व मांडणी - | प्रफुल्ल जामनेरकर |
| ई - आवृती - | २५ जून २००५ |


अनेक दशकांपूर्वी जेव्हा आपला समाज घोर अज्ञानात चाचपडत होता, तेव्हा निधडेपणानं स्वतःच्या आयुष्याचं समर्पण देऊन, एका थोर समाजसुधारकानं हे लैंगिक शिक्षणाचं इवलसं रोपटं भारतात लावलं व वाढवलं.
त्या द्रष्ट्या माणसाचं नाव आहे, **रघुनाथ धोंडो कर्वे** !
त्यांना विनम्र अभिवादन करुन ही पुस्तिका लेखक त्यांना अर्पण करीत आहे. - डॉ. अरुण गद्रे

मनोगत

मनोगत 'हितगुज लेकीशी' या छोटया पुस्तिकेचा जन्म पंचवीस वर्षापूर्वी झाला. माझ्या स्वतःच्या खर्चानं (इन्टरशिपचा पगार तेव्हा महिना रू.चारशे पन्नास होता!) पाचशे रूपयांत पाचशे प्रती छापून मी एक मोठाच अव्यापारेषु उद्योग केला होता. ती पुस्तिका खपेना! मग लोकविज्ञान संघटनेच्या माध्यमातून तिची विक्री केली. त्या वेळेस प्रर्दशनात मांडलेली ही पुस्तिका अगदी थोडया वेळात हातोहात खपली. एवढी तिची गरज जाणवत होती. पण सामाजिक चळवळीच्या पुरस्कर्त्यासकट सर्व प्रकाशकांना ती उपयुक्त वाटत नव्हती. यातल्या काही प्रकाशकांनी व्यक्तिशः आपल्या घरात तिचा उपयोग केला....पण व्यावहारिक गणितं मांडत ती काही छापली नाही.!
होता होता मीच देशमुख कंपनीचा लेखक झालो. 'घातचक्र' या कांदबरीनं डॉ.सुलोचना राम देशमुख या 'देशमुख आणि कंपनी'च्या तत्कालीन प्रकाशिका. रा. ज. देशमुखांची ह्या सुविद्य पत्नी. त्यांच्याशी मी एकदा विषय काढला. आश्चर्याचा धक्काच बसला. त्या डॉक्टरेट होत्या समाजशास्त्रात. आणि त्यांचा प्रबंधाचा विषय होता 'कुमारीमाता'. त्यांच्या गाईड होत्या 'इरावती कर्वे'!. मी छापलेली पुस्तिका 'रघुनाथ धोंडो कर्वे' यांना' अर्पण केली होती. थक्क करणारा हा दुवा होता. देशमुख आणि कंपनी... जी एक व्यावसायिक कंपनी... तिनं आनंदानं 'हितगुज लेकीशी' ही पुस्तिका लगेच छापली. तथाकथित समाजक्रांती करण्याचा ढोल वाजवणाऱ्या प्रकाशनसंस्थेच्या नकारापुढे हा देशमुख आणि कंपनीचा होकार एकूणच उद्‌बोधक होता. किमंत ठेवली फक्त दहा रूपये! आजही दहा वर्षांनी तीच किमंत आहे. प्रदर्शनातून ही पुस्तिका खपते. ९००० च्या आसपास ह्या पुस्तिकेच्या प्रती खपल्याहेत.
मराठीवर्ल्ड.कॉमने जेव्हा हे ई-बुक प्रकाशित करायचं ठरवलं तेव्हा मी खरोखरच रोमांचित झालो !. पण हे ई-बुक कोणासाठी? भारत सोडलेल्या व अमेरिका/ऑस्ट्रेलिया/युरोपमध्ये स्थायिक झालेल्या आजच्या मराठी 'मन' असलेल्या आयांसाठी ! हे त्यांचे उत्तर होतं. मग जरा इकडे तिकडे चौकश्या केल्या. इयत्ता पाचवीत (वय ११) जर मुलीला तिथल्या शाळा ओरलपिल्स, कंडोम, इन्टरकोर्स इ. चे लैंगिक शिक्षण वर्गातून देत असल्या तर मग या पुस्तिकेची गरज काय? हा पहिला प्रश्न मी विचारला. तर आहे गरज. कारण उघड आहे. लैंगिक शिक्षण हे आईनेच मुलीला द्यायला हवं हे माझे ठाम मत आहे. भारतात ते शाळांमध्ये उपलब्ध नाही. अर्थातच ही पुस्तिका इथे दुर्गा-भागवतांनी गौरवल्याप्रमाणे 'आधुनिक स्त्रीचे उपनिषद आहे'. पण शाळांमधून जिथे लैंगिक शिक्षण इतक्या विस्तृतपणानं दिलं जातं, सांस्कृतिक वातावरणच जिथे डेटींग, आणि लग्नाअगोदर सेक्सचं आहे अशा वातावरणात वाढलेल्या व वाढणाऱ्या मुलींना या पुस्तिकेचा उपयोग काय आहे? कारण पुन्हा तेच. आईचं वात्सल्य, ममता व कळकळ याला कोणताही पर्याय नाही. तिथल्या आयांना तर या विषयावर खूप काही बोलायचंय आपल्या मुलींशी! त्या बोलतातही. पण ही पुस्तिका त्यासाठी एक चांगलं लॉंचीग पॅड ठरेल. चौथीत, दहाव्या वर्षी, शाळेत शिकवण्याच्या थोडया अलीकडे जर आईनं मुलीला जवळ बसून (उपनिषद) पुस्तकातील पहिला भाग वाचून दाखवला तर शाळेचं लैंगिक शिक्षण हे केवळ तंत्र शिकवेल. मूल्य शिकविणार नाही. लैंगिक शिक्षण हे मूल्य शिक्षणाशिवाय देणं हा प्रकारच मुळात मूर्खपणाचा आहे. तिथल्या समाजात 'तटस्थ' लैंगिक शिक्षणाचा वापर केला जातो. त्या वातावरणात ही पुस्तिका 'मूल्याचा' अभाव भरून काढेल. अगदी थेट सांगायचं तर त्या पुस्तकातली आई तिच्या मुलीला, लग्नाअगोदर इन्टरकोर्सला, सेक्सला ठाम व नक्की नकार दे, असं सांगते. सर्वच शिक्षणाबाबत 'याचा उपयोग होईल का'? हा प्रश्न विचारला जातो. लैंगिक शिक्षणाच्या बाबतीतही तो विचारला जातो व ते जास्त संयुक्तिकही आहे. या प्रश्नाचं उत्तर असं की तोल गेलेलं मूल्यरहीत लैंगिक शिक्षण एवढंच मुलीला का मिळावं ? लग्नाअगोदर सेक्सचे परिणाम तिला कुणीतरी शिकवायला नकोत का? जरी ती तिचा निर्णय घ्यायला स्वायत्त आहे तरी तिच्यापुढे निर्णय घेण्याअगोदर त्या निर्णयाचे असणारे सर्व पैलू मांडले जायला नकोत का? अन् हे काम तिच्या आईशिवाय दुसरं कोण करू शकेल? या अर्थानं ही पुस्तिका तिथल्या आयांनाही उपयुक्त ठरेल असा माझा विश्वास आहे. हे एकदा ठरवलं व पुढचा प्रश्न उभा राहिला. आईची मुळं मराठी मातीतली त्यामुळे तिला उच्च दर्जाचं मराठी निश्चितच समजेल व वाचायला आवडेल. पण ते मराठी ऐकणार आहे तिची पाश्चात्य देशात वाढणारी मुलगी. मग या मराठी आईनं तिला इंग्रजीतच का वाचून दाखवू नये एखादं

© डॉ. अरुण गद्रे
www.marathiworld.com

पुस्तक? मराठीच का? याचं उत्तर असं आहे की, मराठी ही बोली भाषा आहे. अजूनही तिथल्या घरात निदान पन्नास टक्के मराठी बोलली जाते तसंच आईची मातृभाषा मराठी... त्यामुळे तिला अपेक्षित मूल्यशिक्षणा मागची कळकळ ही मराठीतच त्या मुलीपर्यंत जास्त सहज पोचवता येईल.

मग मला मनाविरूध्द तडजोड करावी लागली. इंग्रजीवर प्रभुत्व असूनही कटाक्षानं शंभर टक्के शुध्द व अचूक मराठीत लिखाण करणारा मी! मला वाक्य मराठी.... पण शब्द इंग्रजी ही तडजोड करणं भाग पडलं. प्रश्न मूल्यशिक्षणाचा संदेश पोहचवण्याचा होता. मराठी भाषेचा नव्हता!. या पुस्तकिचा भर, भाषा व आशय संपूर्ण सर्वच मूळ मराठी पुस्तिकेपेक्षा संपूर्ण वेगळा आहे. कारण ऐकणारी मुलगी ही संपूर्ण वेगळ्या संस्कृतीत वाढते आहे. पण ज्ञान माणसाला मुक्त करतं हा विश्वास आणि लैगिक शिक्षण हे मूलतः मूल्यशिक्षण आहे. हा आग्रह मात्र तसाच तीव्र आहे. तिथली तरुणाई ही मल्टीपल सेक्स, अर्बोशन आणि डायवोर्स या अनेकविध वादळातून स्वतःचा मार्ग शोधून काढते आहे. तिथल्या एखाद्या मुलीला.... जिची मुळं व जीन्स मराठी मातीशी निगडीत आहेत.... तिला काही एक सुकाणू या अल्पशा प्रयत्नानं मिळू शकलं तर या पुस्तिकेचं प्रयोजन सार्थ होणार आहे. मुलीला आणि तिच्या आईला शुभेच्छा!



डॉ. अरूण गद्रे, एम.डी. डी.जी.ओ.
गद्रे हॉस्पीटल, लासलगाव,
ता. निफाड जि. नाशिक.
महाराष्ट्र - ४२२३०६. भारत
दूरध्वनी - ९१-२५५०-२६६५२६
भ्रमणध्वनी - ९८२२२४६३२७
ई-मेल :- arunjyot_nsk@sancharnet.in

दहा वर्षाच्या मुलीसाठी शाळेत लैंगिक शिक्षण दिलं जाण्याअगोदर एक दोन महिने आईने मुलीला जवळ बसवून ही पत्ररुपी पुस्तिका वाचून दाखवायची आहे.

अग मी ममा. बस समोर आज मी तुझ्याशी गप्पा मारणार आहे. अगदी Personal हं. ok Done. स्कूलमध्ये Teacher ने तुम्हाला Modelच्या सहाय्याने Menstrual Period बद्दल व इतर माहिती दिलीय का ? 0K दिली किंवा नाही दिली. तरी I Want to have a talk with You. आई म्हणून एकच Please Don't inturrupt. जे काही प्रश्न असतील .... मी नंतर सगळी उत्तरं देईन. I Promise आता तुला दहा वर्ष पूर्ण होतील नाही ? Wow ! Great . लवकरच ' मोठी ' होणार आमची ही बाहुली ! तुला आठवतं... मी एकदा तुला सांगितलं होतं की तू माझ्या पोटात वाढलीस ? Now Don't Giggle. मोठया मुलीसारखं Seriously ऐकून घे. लहान मुलीसारखी खिदळू नको.
सगळे आजोबा...आजी...पपा...मी...तू...सगळे त्यांच्या त्यांच्या ममांच्या पोटात वाढतात. त्याबद्दल बोलायचंय मला. स्त्रियांमध्ये ... I mean Woman आणि Girls मध्ये एक छोटी Muscular Sack असते त्याला Uterus म्हणतात. ते flexible असते.
ते पोटात खालील बाजूस असतं. Tummyत. तुझ्या पोटात सुध्दा ते Uterus आहे. तुझे वय जसं वाढेल तसं गर्भाशय सुध्दा वाढेल. तुझ्यासारख्या लहान Kid च्या पोटातलं Uterus छोटूसं असतं. Small one असतं. पण तू मोठी होशील तस ते मोठं होईल. माझ्यासारख्या मोठ्या Womanच्या पोटातलं Uterus हे मोठ्ठं असतं. A large one. Every woman has it . अन् Man मध्ये ते नसतंच. एकाही पुरूषाच्या .. वा लहान मुलाच्या पोटात Uterus नसतं, म्हणून Woman फक्त Baby जन्माला घालू शकते. Man can never grow baby in his tummy. एखादया बाईच्या (Woman) च्या पोटातल्या Uterus मध्ये जेव्हा Baby असते... ते पोट फुगीर... मोठं दिसतं.. लांबूनच ओळखू येतं. तू पाहिलंस एखादं ? आज माझ्या पोटात Baby नाही. म्हणून माझं पोट बाहेरून मोठं दिसत नाही. पण माझ्या पोटात आताही Uterus आहे. छोटया मुलींचं Uterus छोटं असतं. Naturally ते काही त्यात Baby वाढवू शकत नाही. पण तू आता दहा वर्षाची होशील. हळूहळू मोठी होणार तू. आता तुझी Body आकारानं वाढेल, Tall होशील तू. हळूहळू पोटातल्या Uterus चा आकारही वाढेल. कळलं ? अजून एक. आपण दूध milk पितो ते Cow च्या पिल्लूसाठी तयार होतं. नवीन जन्मलेलं लहानसं Cow चं पिल्लू काय किंवा आपलं एखादं Baby काय. त्यांच्या तोंडात दात नसतात. आपण जेवतो तसं ते काही जेऊ शकत नाही, म्हणून त्यांच्या आईच्या Breasts मध्ये Milk असावं लागतं त्यांना पाजायला. खूप गंमत वाटते नाही ? एखादं बाळ आईच्या Breasts मधून Milk पितं तेव्हा Cute दिसतं ! आणि प्रत्येक ममाला इतकं Pleasure वाटतं आपल्या Babyला पाजायला! A Great feeling it is ! मला आजही आठवतं ते ... मी तुला Milk पाजायची. It's a tarific Joy. म्हणजे जर एखादी Small Kid आता मोठी होणार आहे, तिचं Uterus Grow होणार आहे. ते Baby वाढवणार आहे. तर तिच्या होणाऱ्या Babyसाठी तिच्या Breasts मध्ये Milk जमा व्हायला हवं. म्हणजे तिच्या Breasts आकारानं वाढायला हव्या. नाही का ? म्हणून Small kid जशी मोठी होते. हळूहळू तिच्या Breasts वाढू लागतात आकारानं . I Know हे सगळं जरा Awkword, Messy च वाटतं. प्रत्येक Small kid ला ! अन् ज्या मुलींना असं काहीतरी होणार आहे याची कल्पनाच नसते. Well... त्यांना तर भितीच वाटते ! पण लहानाचं मोठं होताना These changes they are must. Thats why मी आधीच सांगतेय तुला. Ok जसं वय वाढतं... Breasts वाढणार. उलट एखाद्या मुलीचे Breasts जर १८ Years पर्यंत वाढलेच नाहीत Well I suppose तिच्या ममानं तिला डॉक्टरांकडे घेऊन जायला हवं ! No पुरूषांच्या Breasts वाढत नाहीत. का वाढाव्या त्या ? पुरूषाला कोठे Baby वाढवायचं असतं पोटात ? पण Boy's मध्ये सुध्दा वय वाढताना Changes होतात. For example Beard and Mousthache I दाढी....मिशा ! पपांना रोज शेव्हींग करावं लागतं . मला नाही लागत ! मुलींना काही दाढी मिशा येत नाहीत पण Hair do come . कुठे येतात हे Hair ? Arm pits मध्ये येतात व Front of Thighs आणि Urinate करण्याची जी Slit असते



ना In between the Thighs. त्याच्या आजूबाजूला Hair येतात, वय वाढताना. Come on Don't feel embaraced. देवानं जे निर्माण केलंय ते कधीच Ugly असू शकत नाही. हे सर्व Natural आहे आणि A must when one grows. I agree. थोडं Emberacing होतच ते प्रत्यक्ष घडताना प्रत्येक मुलीला आय नो. आणि मला वाटतं मुलींना असंही वाटायलाच पाहिजे की, जेव्हा ब्रेस्ट वाढतील व हेअर येतील तेव्हा, की ...''वॉव!.. याचा अर्थ असा की मी आता मोठी वुमन होऊ लागले. आता मी स्मॉल किड नाही राहिले!'' नाही का ? अजून एक, हे जे बदल होतात ना...सगळे जादुसारखे एकाच दिवसात नाही होत. अन त्याचा काही फिक्स पॅटर्न नसतो. काही बदल आधी होतात... काही नंतर. असं सुध्दा होतं. दोन ब्रेस्ट मधली एक या रेसमध्ये पुढे जाते व दुसरी पाठोपाठ वाढते. जर दोन्ही सारख्या साईजच्या नसल्या तरी काहीच महिन्यात दोन्ही ब्रेस्ट सारख्या साईजच्या होतात. तर आता दोन तीन वर्षात ब्रेस्ट वाढतील तुझ्या, केस येतील अन् एक दिवस मेन्स्ट्रुअल पिरीयड येईल. मेन्स्ट्रुअल पिरीयड येतो म्हणजे युटेरसमधून ब्लिडींग होतं. हे ब्लिडींग साधारण ४-६ दिवसांपर्यंत होतं. महिन्यातून एकदा. मेन्स्ट्रुअल पिरीयड (मन्थली पिरीयड) येण्याचा काळ हा जनरली १० ते १८ वर्ष वया पर्यंत असतो पण काही केसेसमध्ये हा काळ १-२ वर्ष मागे पुढे होऊ शकतो. स्त्रीला वयाच्या ४०-५० वर्षापर्यंत मेन्सट्रुअल पिरीयड येतात. त्यानंतर ते बंद होतात. त्याला menopause म्हणतात. The menstrual cycle is the periodic change in a woman's body that occurs every month between puberty and menopause and that relates to reproduction. The average human menstrual cycle, regulated by hormones, takes 28 days, but it can range from 21 to 35 days. डोन्ट फील एम्बरेस्ड... ऑर शाय. प्रत्येक नॉर्मल वुमनला दर महिन्याला मेन्स्ट्रुअल पिरीयड येतो. मला सुध्दा येतो. उलट एखाद्या मुलीला जर एटीन इअर्सपर्यंत मेन्स्ट्रुअल पिरीयड आला नाही तर तिला डॉक्टरांकडे न्यायला हवं. अहं... ब्लड म्हणजे काही अग्ली गोष्ट नाही. हात, पाय, इन्टेस्टाईन, युटेरस या सर्व ऑर्गनना ब्लडची आवश्यकता असते. अपघातात जखमी होऊन जर ब्लड वाहून गेलं तर मात्र लाइफच डेन्जरमध्ये येतं. असं युजफूल ब्लड, अग्ली कसं ? बेबी युटेरसमधून बाहेर आलं की त्याची हंगर भागवण्यासाठी ब्रेस्टमध्ये दूध असतं. ओ.के. पण ते युटेरसमध्ये असताना त्याची हंगर कोण भागवेल ? ममाचं रक्तच युटेरसमध्ये त्या बेबीसाठी ऑक्सीजन, शुगर घेऊन जातं. दर महिन्याला हे ब्लड बेबीची वाट बघत युटरेसमध्ये साचतं. बाळ आलं नाही तर ते बाहेर टाकलं जातं. कुठून टाकलं जातं हे ब्लड बाहेर ? थाईजमध्ये ॲनस आणि युरेथ्रा यामध्ये जी छोटी स्लीट असते त्याला vagina (योनीमार्ग) म्हणतात. त्यातून हे ब्लड बाहेर टाकलं जातं. हाच योनीमार्ग (vagina) पोटात युटेरसला जोडलेला असतो. राईट?



ज्या मुलीच्या वा वुमनच्या पोटात बेबी असेल तिला मेन्स्ट्रुअल पिरीयड येणं थाबतं ते नऊ महिने. पण जिच्या युटेरसमध्ये बेबी नाही, ती मुलगी वा बाई दर महिन्याला चार दिवस रक्त बाहेर टाकते व त्यालाच मेन्स्ट्रुअल पिरीयड येणं असं म्हणतात. तू आज खूप लहान आहेस, तुझं युटेरस इतकं छोटं आहे म्हणून ते ब्लड साठवत नाही. आता दोन-तीन वर्षात तू वाढशील, तुझे युटेरस वाढेल व त्यात ब्लड साठू लागलं की तुला मेन्स्ट्रुअल पिरीयड सुरु होईल. अहं. पुरुषांच्या पोटात युटेरस नसतं... त्यांना मेन्स्ट्रुअल पिरीयड ही येत नाही. पुरुषांना बेबी हवं तर ते वुमनवर डिपेन्डन्ट असतात. तुझ्या पप्पांना तू घरात हवी होतीस म्हणून त्यांना मला आणावं लागलं. या घरात पहिल्यांदा बायको म्हणून! बघ! जर का एखाद्या मुलीला माहिती नसेल की पहिला मेन्स्ट्रुअल पिरीयड येणार आहे म्हणून .... किती घाबरेल ती ! रक्त वाहू लागलं, दोन थाईजमधून अचानक, तर किती भीती वाटेल तिला. तिला वाटेल ''हा काय डीसीज ?'' तुला मात्र तसं वाटणार नाही. उलट पहिला मेन्स्ट्रुअल पिरीयड आला की तू म्हणशील ''कूल '' मी आता ग्रोनअप वुमन होतेय! नो लॉंगर आय ॲम अ किड! ok?" कधी येईल हा पहिला मेन्स्ट्रुअल पिरीयड तुला ? देवालाच नक्की दिवस माहीती! पण दोन-तीन वर्षात येणार हे नक्की, हो तो कुठेही येऊ शकतो. काहीही वॉर्नींग न देता. स्कूलमध्ये, घरी, व्हाईल प्लेइंग ऑन द ग्राऊंड . स्कूलमध्ये सुरु झालं ब्लिडींग तर जस्ट टीचरला सांगून टाक. ती तुला सॅनिटरी नॅपकीन देईल. दोन थाईजमध्ये तो वापरायचा असतो. नोबडी इव्हन गेस फ्रॉम आऊट साईड.. पहिल्या पहिल्यांदा हा पिरीयड रेग्युलर नसतो. पण सहा महिने

ते वर्षभरात तो रेग्युलर महिन्या महिन्याला येऊ लागतो. सर्वसाधारणपणे २८ दिवसांनी हा पिरीअड येतो.
अहं.... मेन्स्ट्रुअल पिरीयड पेनफुल नसतो. कधी क्वचितच क्रॅम्प येतात पोटात. बॅक पेनही होतं. पण वन कॅन मॅनेज इट विथ फ्यू पिल्स. अन मेन्स्ट्रुअल पिरीयड चालू असताना सर्व नॉर्मल ॲक्टीव्हिटी तशाच चालू ठेवायच्या असतात. स्कूल.... प्ले...... सगळं. फक्त सॅनिटरी नॅपकिन वापरायचा व ती जागा स्वच्छ ठेवायची. दॅट्स ऑल. नाऊ आय ॲम रिलॅक्स... बट प्लीज डू वन थिंग, जेव्हा तुझा पहिला मेन्स्ट्रुअल पिरीयड येईल ना, तेव्हा सर्वात प्रथम मला सांग ती न्यूज. Ok ? आपण सेलीब्रेट करू! आय प्रॉमिस. आता एक किस दे ..... अन ऑफ टू युअर स्टडीज !
चौदा वर्षाच्या मुलींसाठी जिला स्कूलमध्ये Contraception, कंडोम सेक्सुअल इन्टरकोर्स या सर्वांची इन्फॉर्मेशन मिळाली आहे. जिच्या मैत्रिणी डेटींगही करू लागल्या आहेत. लग्नाअगोदरच सेक्सुअल ॲक्टीव्हीटी होताना तिला कळलेलं आहे. तिच्या ग्रुपमध्ये सेक्स व सेक्सरीलेटेड गॉसिप हा हॉट सब्जेक्ट आहे.

मला तो दिवस आजही आठवतो. मी तुला मेन्स्ट्रुअल पिरीयडबद्दल सांगितलं होतं. वॉव काय क्युट दिसत होती, चिक्स रेड झालेली ही छोटी डॉल ! अन् आपण काय सेलेब्रेट केला होता तो दिवस..... ज्या दिवशी तुला पहिला मेन्स्ट्रुअल पिरीयड आला!. ग्रेट ! आता ते मागे पडलं. आता तू एक मेन्स्ट्रुअल पिरीयड रेग्युलर येणारी मॅच्युअर हेल्दी वुमन होते आहेस. ग्रेट. आय नो .... तुला ओरलपिल्स, कंडोम, इन्टरकोर्स या सर्वांची कल्पना आहे. तरीही मला तुला ते एकदा सांगायचंय. एक ममा म्हणून, प्लीज.....प्लीज लेट मी टेल यू ? Ok ! युटेरसमध्ये बेबी कुठून येतं ? लेट मी असर्ट वन थिंग. सपोज.... कुणाला माहीत नाही की, पहिला मेन्स्ट्रुअल पिरीयड येणार म्हणून. इट डज नॉट मॅटर. तो येणारा येतोच. पण युटेरसमध्ये बेबी रहातं त्यावर आपला पूर्णपणे कंट्रोल असतो. दॅट्स व्हाय मी जे सांगतेय ते महत्त्वाचं आहे. खूप महत्त्वाचं.
Ok ? आपण एग्ज खातो... ती कोंबडीची... हेनची असतात. तसंच वुमन व मॅनचं अंड असतं. खूप छोटं, एका हेनच्या एग्जमध्ये ... वुमेनची मिलीअन एग्ज मावतील इतकं वुमेनचं एग छोटं असतं. मायक्रोस्कोप लागतो ते बघायला. युटेरसला दोन टयुब्ज् असतात व त्या टयुबच्या एन्डला दोन ओव्हरीज. या ओव्हरी म्हणजे एग्ज देणाऱ्या फॅक्टरी. दोनपैकी एका ओव्हरीत दर महिन्याला एग वाढतं. ते पोटात फेकलं जातं. टयूब ते एग पुढे सरकवते व ते एग युटेरसमध्ये ढकललं जातं. त्या एग्जचं रूपांतर बेबीच्या एगमध्ये झालं नाही तर ते एग व साठवलेलं ब्लड मेन्स्ट्रुअल पिरीयड बरोबर बाहेर टाकलं जातं. एग छोटं असतं. आपण ते बघू शकत नाही. आपल्याला फक्त ब्लड दिसतं. तू छोटी होतीस तेव्हा ओव्हरीची फॅक्टरी बंद होती ! त्यामुळे मेन्स्ट्रुअल पिरीयड आला नव्हता असं का? अगं, ज्या मुलीला तिची काळजी घ्यायला तिची स्वत:ची ममा लागते तिला बेबी होऊन कसं चालेल? तू समजा सेकंड स्टॅण्डर्डमधे आहेस व तेव्हा तुला बाळ झालं... कशी काळजी घेऊ शकशील तू त्याची? तुला ना एज्युकेशन ना अर्निंग ! म्हणून लहानपणी देवानं ती फॅक्टरी बंद ठेवलेली असते ! ओ.के. ? आज तुला मेन्स्ट्रुअल पिरीयड येतो म्हणजेच तुझ्या शरीरात तुझ्या एगचं रूपांतर बेबीच्या एगमधे होत नाही. का ? यू नो इट. बेबीचं एग तयार व्हायला वुमनचं एग व मॅनच एग एकत्र यावं लागतं. इटस् मिरॅकल! रिअली मिरॅकल ! एक छोटं एग बेबीचं, त्यापासून मिलीयन्स ऑफ सेल्स.... अख्खं शरीर घडतं. हार्ट धडधडतं. हातपाय हालतात. Wow ! अ ग्रेट मिरॅकल. अन हा चमत्कार घडतो तो आपल्या वुमनच्या शरीरात. आय ॲम प्राऊड टू बी अ वुमन ! आय नो ...यू आर टू . पुअर मेन ..... हाऊएव्हर दे विश ... हा एक्सपिरीअन्स त्यांना घेताच येत नाही कधी ! आपल्या वुमेनना जो आनंद मिळतो, पोटात बेबी हलतं तेव्हा, आय टेल यू..... इट्स टेरीफीक फीलींग. तू माझ्या पोटात होतीस ना ..... आय स्टील रीमेंबर इट. Ok. वुमन व मॅनची एग्ज एकत्र येतात कशी ? यू नो इट. पुरूषाला थाईजच्या फ्रंन्टला मस्क्यूलर पाईप लाईक पेनीज असते. या पेनीजमधून एकाच आऊटलेटमधून युरीनही बाहेर येतं व जेल लाईक व्हाईट सब्स्टन्सही. याच्यात पुरूषाची मिलीअन्स ऑफ एग्ज असतात. त्यांना स्पर्म म्हणतात. नाऊ डोन्ट गिगल. या पेनीज हंग. इट्स फनी : पण दॅट्स हाऊ मॅन्स बॉडी इज मेड बाय गॉड. लिसन लाईक अ ग्रोनअप वूमन. डोन्ट बिहेव लाइक किड ! ओके ? हे जे स्पर्म असतात.... दे हॅव टेल्स, दे



मुव्ह. पण स्त्रीचं, वुमनचं अंडं पोटात हे स्पर्म शरीराबाहेर तिच्या. कसं भेटणार एकमेकांना ? त्यासाठी मुव्ही .... सिरीयलमध्ये दाखवतात तसं स्त्री-पुरुष दोघं नेकेड... एकमेकांच्या जवळ येतात. पुरुष आपली पेनीज स्त्रीच्या थाईजमध्ये असलेल्या व्हल्वात ... स्लीटमधे घालतो व व्हाईट जेल स्त्रीच्या व्हजायनात डिपॉजीट करतो. पुरुषानं स्त्रीच्या व्हल्वात त्याची पेनीज इन्सर्ट करणं यालाच इन्टरकोर्स किंवा सेक्स म्हणतात. Ok

नाऊ लिसन टू मी. हा एक इन्टेन्स इम्पल्स असतो. मॅच्युअर पुरूषाचा व मॅच्युअर स्त्रीचा दोघाचा. एकमेकांचं त्या इम्पल्सनं नॅचरल ॲट्रॅक्शन वाटतं स्त्री-पुरुषांना. देवानं हे अट्रॅक्शन निर्माण केलंय. जर ही माणसाची जात पुढे चालूच रहायची तर या अर्थवर..... वुमनना मुलं व्हायला हवीत. इन एव्हरी जनरेशन. त्यासाठी इन्टरकोर्स व्हायला हवा. त्यासाठीच हे नॅचरल अट्रॅक्शन देवानं निर्माण केलंय. ओव्हरीज, मेन्स्ट्रुअल पिरीयड, इन्टरकोर्स, पेनीज, स्पर्म्स, स्त्री-पुरुषांचं नॅचरल अट्रॅक्शन या सर्वांची डिरेक्शन आहे.... बेबीच्या कन्सेपशनचा चमत्कार! हे सगळं.... त्या एका गोष्टीसाठी , Ok? हे स्त्री-पुरुषाचं नॅचरल अट्रॅक्शन टीव्ही, मुव्हीज, लव्ह पोएमस, नॉवेलस.....मध्ये दाखवतात. आता तुलासुध्दा हे पुरूषांचं अट्रॅक्शन वाटू लागलंय. डोन्ट ब्लश, इट्स कुल...इट्स नॅचरल. आता तुला दोन गोष्टी पॉसीबल आहेत. नं.१- तू आता पुरूषाबरोबर झोपू शकशील व इन्टरकोर्स करू शकशील. OhNo. डोन्ट बी एम्बरेसड्. हे असं Real truth आहे. वन मस्ट फेस इट पॉइन्ट बॅकली. Ok . देवानं निर्माण केलेलं हे अट्रॅक्शन व हा इन्टरकोर्स..... तो काही अग्ली .... वाईट असू शकत नाही. I warn you. हे अट्रॅक्शन खूप इन्टेन्स असतं. एखादा साधा टचसुध्दा एक्सप्लोड होतो ! मॅग्नेटसारखे स्त्री-पुरुष ओढले जातात. इन्टरकोर्स घडून जातो, आणि जेव्हा सहज ... नॅचरल आहे हा इन्टरकोर्स तेवढंच सहज व नॅचरल आहे त्याचं आऊटकमही. या प्रत्येक इन्टरकोर्सबरोबर ॲटॅज वुमन/तू रिस्क घेणार आहेस. तुझ्या युटेरसमध्ये बेबी कन्सीव व्हायचं. लेट मी रीपीट बेबी कन्सीव होणं हा प्रत्येक इन्टरकोर्स मधला खराखुरा धोका...रीस्क आहे. आय नो, तुला हे माहिती आहे. पण मला त्याची खात्री करून घ्यायची. ॲज युवर ममा....मला यांची खात्री करून घ्यायची की या रीस्कची तुला डेफीनेट इन्फॉर्मेशन आहे. त्याच्यासाठीच मी तुझ्यापाशी हे बोलतेय. Ok? आता या पुढे मी तुला जे सांगणार आहे, वेल ! फारसं पॉप्युलर नाही ते तुझ्या मित्रमैत्रिणींच्या जनरेशनमध्ये. आय नो.... तू ते मान्य करणार नाहीस कदाचित. पण मी तुझी आई आहे. मी तरूण होते एकेकाळी, ते वय.... त्याचे प्रॉब्लेम मला माहीती आहेत. जग बघितलंय मी . अन माझं असं काही निश्चित कन्व्हीक्शन आहे. एकदा ऐकून घे . Ok ? एका वाक्यात मी तुला सांगणार आहे. ' लग्नाअगोदर सेक्सला ठाम व निश्चित नकार दे . अहं.....मी रीलीजीअस सर्मन देणार नाही. मी फक्त रीअल लाइफ इव्हेन्ट डिसकस करणार आहे. प्रॅक्टीकल फॅक्टस. आय नो.... कंडोम, कोन्ट्रेसेप्टीव्ह वापरून बेबी कन्सीव कसं होऊ द्यायचं नाही व सेक्स ॲक्ट करायचा ते तुला माहीत आहे. पण तुला हे माहीत आहे का ? इन रीअल लाइफ.... यातलं काहीही न वापरता सेक्स ॲक्ट अचानक ठेवला जातो? इट्स फॅक्ट. केअर सेंटरवर थाऊजण्डस ऑफ अनमॅरीड सिंगल गर्ल्स व वुमेन्स प्रेग्नसी घेऊन येतात. व्हॉट डज इट मीन ? इट मीन्स, काहीही प्रिकॉशन न घेता सेक्स घडणं कॉमन असतं. का? लेट मी टेल यू द रिझन ते काही सेक्स एज्युकेशनच्या क्लासमध्ये शिकवतातच असं काही नाही. इट्स प्रॅक्टीकल रिझन. मोस्टली कोणत्याच मुलीला व इव्हन वुमनला .... मुळात असा सेक्स ॲक्ट ठेवायची इच्छा नसते. वुमन नेहमीच.... रीलेशनशीप व लव्हींग रिस्पॉन्सीबल पुरूषाला जास्त इर्म्पोटन्स देते. Always. वुमन सेक्स सिक्युरीटी फर्स्ट फिजीकल पार्ट ऑफ इन्टरकोर्स हा त्या सिक्युर्ड लव्हींग रीलेशनशीपचा जस्ट पार्ट असाच ती मानते. पुरूषाचं तसं नसतं. बाय नेचर त्याला प्रत्यक्ष फिजीकल इन्टरकोर्सचा प्लेजर जास्त महत्त्वाचा वाटतो, व या रीअल लाइफ स्ट्रगलमध्ये वुमन सेक्स ॲक्टला अगेन्स्ट हर विल... सकम्ब होते ती केवळ एकाच फीअरनं..... आपला बॉयफ्रेन्ड आपण नो म्हटलं तर दूर जाईल, त्यामुळे होतं काय..... वुमन पिल्स घेत नसते....व बॉयफ्रेंडकडे कंडोम नसतो. दोघंही पीअर प्रेशर.... सेक्स इज कुल अशी एक वेव्ह... त्यात सेक्स करतात. बिलीव्ह मी. हे असंच घडतं. अन अर्धवट एजमध्ये .... आपण मॅच्युअर नसताना,



पूर्ण सायकॉलॉजिकल प्रीपरेशन नसताना जे अनप्रोटेक्टेड, ॲक्सीडेंटल सेक्स ॲक्ट घडतात ना.....बिलीव्ह मी. मोस्ट गर्ल्स रीपेन्ट गेट फ्रस्टेटेड मोस्ट ऑफ द टाईम्स. इरीटेशनच आऊटकम असतं. पण जस्ट पीअर प्रेशर असतं दोघांवर. व्हर्जीन असणं म्हणजेच जणू क्राईम असल्यासारखं वाटतं. मुलीला, अन हे घडतं. Ok. असा घडून गेला अनप्रोटेक्टेड सेक्स ॲक्ट. एक प्रॉब्लेम आऊटकम असतं......बेबी. अन ते बेबी जेव्हा कन्सीव होतं..... ते कोणत्याही मुलीसाठी नाइटमेअर असतं, मेनसाठी इझी असतं. तो खांदे उडवू शकतो. जस्ट ही कॅन रन अवे, व बऱ्याच वेळा तो पळूनच जातो. आफ्टर ऑल.... ही हॅज नॉट डन इट टू हॅव बेबी ॲट धिस स्टेज ऑफ हीज लाइफ ! एज्युकेशन नाही , करीअर नाही , अर्निंग नाही.



नो. ही जस्ट कान्ट अफोर्ड टू टेक रीसपॉन्सीबीलीटी ऑफ बेबी ! ही रन्स् अवे. कारण तो पळू शकतो. बेबी त्याच्या पोटात नसतं! मुलीला मात्र निर्णय घ्यावा लागतो. ती या प्रेग्नसीपासून पळू शकत नाही. ती बेबी तिच्या पोटात असते. काय चॉईस आहेत तिच्यापुढे? एक आहे.... ही प्रेग्नसी कन्टीन्यू करणं व बेबीला बर्थ देऊन रीसपॉन्सीबीलीटी घेणं. पण तीही त्या मुलासारखीच. नो एज्युकेशन....करीअर वा अर्निंग. अन तुला मी सांगते. सिंगल पेरेंट बनणं क्वाइट डिफिक्लट असतं. इव्हन फॉर अ ग्रोनअप वुमन जी एज्युकेटेड आहे व जी अर्निंग करतेय. अहं. त्या मुलीनंही या स्टेजला बेबीचा विचारच केलेला नसतो. नेक्स्ट ऑप्शन इज अबॉर्शन. Well..... हाच जर चॉईस तू घेणार असशील..... व्हाय ऑप्ट फॉर कन्सेपशन इन द फर्स्ट प्लेस? सो. लग्ना अगोदर सेक्सला ठाम व निश्चित नकार .... इज रॅशनल चॉईस. वेल.... एक चॉईस अजून आहे. तुझा बॉयफ्रेंड पळून जाणार नाही व दोघं लग्न कराल. ग्रेट ! पण लग्न करण्याचं हे राइट रीजन आहे? तुम्हा दोघांसाठी लग्न हा एक सिरीअस व लाइफ आल्टरींग डिसीजन असणार आहे. नो. या प्रेग्नसीच्या प्रेशरखाली लग्न हा काही राइट डिसीजन नाही. कुणीही लग्न तेव्हाच करायला हवं.... जेव्हा एज्युकेशन पूर्ण होऊन करीअर स्टेज झालं असेल.... दोघांनाही! दोघं जेव्हा फॅमिली सपोर्ट करू शकतील अशाच वेळी लग्न व्हायला हवं आयडली. सो.... केवळ ॲक्सीडेन्टली प्रेग्नसी राहिली म्हणून लग्न.... नॉट राइट ॲट ऑल! सो... अगेन सेम डिसीजन. नो टू सेक्स बीफोर यू मॅरी. नाऊ आय कम टू लास्ट इश्यू. बरेचजण आय नो ....सेक्स हे केवळ सेक्सच्या प्लेझरसाठी करतात. फॉर प्लेझर सेक्स. ते पिल्स घेतात...कंडोमही वापरतात. कंडोमच. आता मात्र मी डीप वॉटर्स मध्ये आहे. आय नो. पण मी पुन्हा कन्व्हीक्शनने सांगीन... इथे सुध्दा, इव्हन फॉर प्लेझर सेक... सेक्सला येस म्हणू नकोस, से नो टू इट. काही महत्त्वाची रीजन्स मला सांगू देत. फर्स्ट ऑफ ऑल सेक्सुअली ट्रान्स्मीटेड डिसीजेस ! लास्ट वन इज AIDS . कंडोम वापरून रिक्स कमी होतं. आय ॲग्री, बट कमी होतं. एलीमिनेट नाही होत. मोस्ट ऑफ द टाईम्स... जेव्हा प्लेझर सेक्स ड्रग्जही घेतली जातात.... अल्कोहोलही. अन कंडोम वापरलाच जातो असं नाही. मल्टीपल पार्टनर्स टू... मग एड्स रिअल रिस्क यात आहे. नेव्हर फरगेट इट. एड्स किल्स ॲज ऑफ टुडे. ड्रग्ज डेथ पोस्टपोन करतात...पण इट किल्स. लाइफ इज टू प्रेशस. डोण्ट थ्रो इट. बाकीही शेन्क्रॉइड, गोनोरिया असे आहेतच सेक्सुअली ट्रान्समिटेड डिसीजेस. खूप पेनफुल कंडीशन्स....इन्फर्टीलीटी होतात त्यांनी. हीपेटाइटीस बी अल्सो किल्स. अन व्हाय हॅव देम...व्हेन यू कॅन ऑलवेज अव्हॉइड? मला तर मूर्खपणा वाटतो तो. फॉर व्हॉट? सेक्स. कमऑन...लग्नानंतर दोघांनाही लाइफलॉंग हा आनंद मिळणारच आहे. लाइफलॉग. व्हाय हरी इट? ॲड लेड इन ट्रबल? बीलीव्ह मी. प्लेझर सेक केला जाणारा मल्टीपल सेक्स प्लेझरही देत नाही. आफ्टर ऑल.... एम्टीनेस कम्स इन. रीसेन्ट सर्व्हेच आहेत. मॅरीड लाइफमधला सेक्स हा नेहमीच लग्नाअगोदरच्या मल्टीपल सेक्सपेक्षा किंवा लग्नाबाहेरच्या सेक्सपेक्षा जास्त रिच... फुलफिलींग आणि प्लेझर देणारा असतो. एक्सपेक्टेशनच चुकीची आहे ती. सेक्स हा फक्त बॉडी रीलेटेड नाही. दुसऱ्याची बॉडी सेक्सुअल प्लेझरसाठी वापरणं .... आपली बॉडी दुसऱ्याला वापरू देणं यात काहीही आनंद नाही. सॅटीफॅक्शन नाही. I Know. हे पटणार नाही आज तुला कदाचित, पण लग्नानंतरचा सेक्स हा एक मिस्टीकल बॉन्ड आहे. तो बेस आहे मॅरीड कपलच्या सर्वच कमिटमेंटचा. यातून ग्रो होते एक मॅच्युअर रीलेशनशीप. इट्स बीयॉंड वर्डस आय अशुअर यू. प्रेम हे कमिटमेंटमधून निर्माण होतं. रीसपॉन्सीबीलीटी शेअर केल्या जातात, मुलं वाढविली जातात. प्रेम हा सेक्सुअल प्लेझर अजून वाढवतं. अप्स् डाऊन्स होतात. आय ॲग्री पण सेक्सचा मिस्टीकल बॉन्ड धरून ठेवतो दोघांनाही. बीलीव्ह मी प्लीज. से नो टू सेक्स बीफोर

© डॉ. अरुण गद्रे
www.marathiworld.com

यू मॅरी ! तू आज माझं ऐकलं नाहीस तर एक्स्पीरीअन्स शिकवेल हेच तुला की आय ॲम राईट. पण मला तेच नकोय. माझी स्वीटहार्ट सेक्सचा हा लेसन एक्सपीरीअन्समधून शिकणार नाही असं वाटतं. कारण एक्स्पीरीअन्स इज अ क्रुऐल टीचर. इट पनीशेस फर्स्ट ॲण्ड टीचेस लेटर. आय डोन्ट वॉन्ट यू टू बी पनीश्ड. ...वेल. नाऊ ओन्ली फ्यू थिंग्ज. एका सीरीयस गोष्टीबद्दल. रेपबद्दल. वेल....फोर्सीबल सेक्स ॲक्ट अंण्डर थ्रेट इन रेप. इट हॅपन्स. लर्न टू अव्हॉइड इट. ग्रुपमध्ये फिरणं.... डीझोल्यूट प्लेसस टाळणं.... ड्रग्ज .... अल्कोहोलपासून दूर रहाणं, फ्यू प्रीकॉशन. रेप हॅपन्स...पण नॉट सो फ्रीक्वेन्टली. फ्रीक्वेन्टली घडतं ते Sexual abuse.... Molestation. आपली ओळखीचीच व्यक्ती .... ते करते. हायडीस इन्टेन्शन्सनं आपले प्रायव्हेट पार्ट या व्यक्ती हॅन्डल करतात. टच करतात. असं कुणीही वुमन, मॅन असा वागला तर रेझीस्ट करायचं. फ्रॅन्कली व कर्टली त्यांना वॉर्निंग द्यायची. सांगायचं... की आय नो व्हॉट यू आर डुईंग ॲण्ड आय डोन्ट लाइक इट. जर तुम्हाला आपली रीलेशनशीप.... फ्रेन्डशीप व्हॉटेवर इट इज... कन्टीन्यू करायची असली तर डोन्ट टच मी. Ok ? दॅट्स ऑल. आय ॲम शुअर. तू खूप शहाणी व मॅच्युअर मुलगी आहेस. ॲडोलेसन्सच्या या सर्व पिरीयडमधून तू निश्चित मार्ग काढशील. कॉलेजात जाशील, करीअर करशील. वुड ग्रो इन टू अ हॅण्डसम मॅच्युअर इन्टेलिजन्ट वुमन. आय नो इट फॉर शुअर. तू तुझा लाइफ पार्टनरही नीट निवडशील. लग्नानंतर तुला बेबी होईल जे मला आजी म्हणेल. आय नो इट फॉर शुअर. मला काहीही डाऊट नाही. पण मला हे सगळं एक आई म्हणून तुला फ्रॅन्कली सांगायचं होतं. इट वॉज माय ड्यूटी. आय ॲम रीलीव्हड नाऊ. प्लीज रीमेम्बर ऑलवेज. रडावसं वाटलं.... मी आहे तयार माझा खांदा द्यायला. कम टू मी. काहीही ओपीनीअन हवंय आय ॲम देअर. अन् कधीही चुकलीस.... फसलीस...काहीही. कितीही रॉंग वागलीस... किंवा राईट पण जेव्हा तू मेसमध्ये असशील व्हॉटेवर इट इज रन टू मी. मी तुझी सर्वात जवळची व्यक्ती आहे. रीमेम्बर इट. यू कॅन आस्क फॉर हेल्प एनी टाईम. ओ.के? अन् मी सांगते तुला... हल्लीच्या फ्रेन्डसारखी मी काही तुझी फ्रेन्ड नाही होणार, कारण तुला मेनी फ्रेन्डस मिळतील. आई....ममा एकच आहे मी ! Ok? डन. बाय देन. विथ लॉट्स ऑफ लव्ह व किसेस.



***

# अभिप्राय

## हितगुज लेकीशी
वयात येताना

डॉ. अरुण गद्रे या एम. डी. डी.जी. ओ. (मुंबई) या पदव्या धारण करणाऱ्या स्त्रीरोगतज्ञाने नाशिक जिल्ह्यात लासलगावी येथे कारकिर्द केली. वयात येणाऱ्या व नुकत्याच वयात आलेल्या मुलींच्या बाबतीतल्या या लैंगिकतेशी निगडीत असलेल्या, पण स्त्रीच्या मानसिक व शारीरिक आरोग्याशी संलग्न असलेल्या प्रश्नांचा विचार त्यांनी 'हितगुज लेकीशी' या पुस्तिकेत केला आहे.

मुलांशी खरे हितगुज करणारा लेखक मला तरी अजून आढळला नाही. मुलांना चौकस करणे, त्यांना मानसिक बळ देणे मोठ्यांचे व्यवहार समजावून सांगणे हे आवश्यक असते. खऱ्या बालकुमार वाङ्मयाचा प्राणच हे हितगुज असले पाहिजे अशी माझी धारणा आहे. पण हितगुजाचे समर्पक प्रात्यक्षिक मात्र गवसत नव्हते ते आता मिळाले म्हणून आनंद झाला. लैंगिक शिक्षण शाळांतूनही द्यावे याबद्दल आता दुमत नाही. शासनालाही तेच अभिप्रेत आहे. पण कुमार वयाच्या उंबरठ्यावर

असणाऱ्या मुलामुलींना अत्यंत गभीरपणे आणि सुलभतेने हे प्राणी सृष्टीतले जननचक्र प्रत्येकाने आपला या प्रक्रियेतला वाटा आणि सामाजिक नीतीचे भान म्हणून कसा उचलायचा याचा प्रयत्न सुझांनी केलेला मी वाचला पण असे हितगुज आणि तेही मायलेकीतले मी प्रथमच वाचले आणि प्रभावित झाले.

ही पुस्तिका लेखकाने आपल्या देशात लैंगिक शिक्षणाचे रोपटे आयुष्य समर्पण करुन लावणाऱ्या र.धों. कर्वे या द्रष्ट्या समाजसुधारकाला अर्पण केली आहे. ते लेखकाची या विषयाची निरोगी जागाच दाखवते. पण लैंगिक हा शब्द फक्त इथेच आलेला आहे. 'हितगुजा'त तो नाही. इंद्रिये, वासना, समागम, बलात्कार असेही शब्द नाहीत. हे नेहमी आमच्या कानावर येणारे शब्द टाळून त्याने हे सर्व आणि सुलभ ,सुरेख भाषेत हे सारे आईच्या ममतेचा आणि सुज्ञ अधिकाराचा उपयोग करुन कसे मांडले आहे ते त्याचे त्यालाच माहीत. असे हितगुज मला खचित लिहिता आले नसते .

प्रश्न-उत्तरे, आकृत्या , क्लिष्ट शास्त्रीय शब्द हे ज्ञानग्रहणाच्या आड येऊ नयेत यासाठी हा साचा वापरला आहे. असे लेखक सांगतो नि आपण आश्चर्याने त्या साच्यात शिरतो व सुखावून आश्वस्त होऊन बाहेर पडतो. या पुस्तिकेच्या पहिल्या भागात आई दहा वर्षाच्या मुलीशी या पुस्तिकेच्या रुपाने ती वाचून दाखवीत हितगुज करते आहे. प्रश्न मुलीला पाळी येण्याची प्रक्रिया कशी सुरु होते हा आहे. रजोदर्शन , 'गर्भाशय' हे शब्द वगळूनच लेखकाने जे गुण सांगायचे ते दहा वर्षाच्या मुलीला समजेल अशा भाषेत समजावून दिले आहे हा याचा मनोज्ञ विशेष आहे.

दुसऱ्या भागात पाळीनंतर मुलीला आई, पुरुषाचा जननक्रियेतला भाग असाच समजून सांगते. तो फार समंजस व गोड आहे. मूल होणे हे स्त्रियांचे सार्थक असते. पण स्त्री-पुरुषातले आकर्षण स्वाभाविक असले तरी अज्ञानामुळे मुलगीच मोहाची बळी ठरते. कारण मूल तिच्याच पोटात असते. पुरुष सुटा असतो. मुलीलाच नाचक्की सोसावी लागते म्हणून सुज्ञ आई तिला विश्वासात घेऊन सारे सांगते आणि कुठल्याही प्रसंगी मी तुझ्या पाठीशी आहे. माझ्यापासून काही चोरुन ठेवू नकोस असे मैत्रिणीच्या नात्याने आईच्या अधिकाराने सांगते. जवळ बसवून केलेला हा हितोपदेश आहे. आधुनिक स्त्रीचे हे उपनिषद् आहे. कारण उपनिषद् म्हणजे गुरुने शिष्याला जवळ बसवून घेवून आपल्याला प्रतित झालेल्या अनुभवाचे सत्य सांगायचे असते आणि ते सत्य हितकारकच असते ज्यांच्या मुली लहान आहेत. त्या सर्व आयांनी (आणि बायांनी देखील) ही पुस्तिका विकत घ्यावी. मुलीशी मनाने एकरुप व्हावे नि तिच्या मंगल भाग्योदयात वाटेकरी व्हावे.

दुर्गा भागवत
ज्येष्ठ लेखिका

© डॉ. अरुण गद्रे
www.marathiworld.com

प्रिय डॉ. अरुण व डॉ ज्योती गद्रे,

स. न. वि. वि.

आपण पाठविलेली तीन पुस्तके मिळाली (हितगुज लेकींशी, हितगुज तरुण-तरुणांशी व तिची ओवी)
तिन्ही पुस्तके वाचली. साध्या, सुंदर, ओघवत्या भाषेत आपण मुलां मुलींना लैंगिक शिक्षण दिलेले आहे. आपली पध्दत लाजवाब आहे. पारिभाषिक शब्दाच्या जंजाळात न शिरता अत्यंत सहजपणे विषय समजावून सांगितला आहे. आपले मन कवीचे आहे संवेदनशील आहे. असेच लिहीत रहा
'संवाद 'मधील आपला कार्यक्रम छान झाला. आपले हार्दिक अभिनंदन !
'हितगुज लेकीशी' ही पुस्तिका वयात येणाऱ्या प्रत्येक मुलीच्या हातात पडल्यास त्यांचे व्यक्तिमत्व खुलेल व अनेक सामाजिक समस्या टळतील. खरे तर शिक्षण खात्याने याचा विचार करायला हवा पण तेथे झारीतील शुक्राचार्य असल्यास संपले !
सामाजिक बदल होतात पण ते संथ गतीने. काळाच्या पुढे असणाऱ्यांची स्थिती र. धो. कर्वे यांच्यासारखी होते. त्यांच्या इतके बळ आपल्यात नाही ही वस्तुस्थिती असली तरी आपण आपल्या परीने प्रयत्न करीत राहाणे इष्ट. साध्य फारसे होत नसले तरी स्वत:चे समाधान आहेच. असे समाधान अधिकाधिक आपणा दोघास लाभो ही सदिच्छा !

डॉ. विठ्ठल प्रभू
M.B.B.S. F.C.G.P. F.I.C.(USA)
Sexologist

© डॉ. अरुण गद्रे
www.marathiworld.com